# वसई-विरार शहर महानगरपालिका
## क्रीडा विभाग

दि.०८/०९/२०२२

## <u>प्रेसनोट</u>

### ११ डिसेंबर, २०२२ रोजी होणार १० वी वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन, स्पर्धेच्या नोंदणीला सुरुवात

राष्ट्रीय स्तरावरील वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉनची १० वी आवृत्ती **११ डिसेंबर** २०२२ रोजी होणार असून त्यासाठी **ऑनलाईन नोंदणी** शुक्रवार **<u>दि.०९ सप्टेंबर</u>** <u>२०२२</u> पासून सुरु होईल, अशी घोषणा महानगरपालिकेचे मा.आयुक्त श्री.अनिलकुमार पवार यांनी केली.

कोविड-१९ या कोरोना विषाणूच्या महामारीमुळे दोन वर्षाच्या खंडानंतर या वर्षी वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन स्पर्धा मोठ्या उत्साहात व भव्य आयोजनात परतली आहे.

११ डिसेंबर २०२२ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉनच्या १० व्या आवृत्तीसाठी नोंदणी शुक्रवार **<u>दि.०९ सप्टेंबर २०२२</u>** पासून सुरु होईल. १० व्या आवृत्तीमध्ये स्पर्धेमधील बक्षिसांच्या रक्कमेत वाढ केली असून यामुळे स्पर्धकांच्या नोंदणीमध्ये लक्षणीय वाढ होणार आहे. एकीकडे बक्षिसांच्या रक्कमेत वाढ केली असताना स्पर्धेच्या नोंदणीशुल्का मध्ये कुठल्याही प्रकारची वाढ केलेली नाही. तसेच “सर्व बाहेरच्या सहभागी धावपट्टूंना निवास आणि भोजनाबरोबरच सर्वोत्तम सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालिका सर्वोतोपरी मदत करेल” असे मा.आयुक्त महोदयांनी सांगितले.

वसई विरार महानगरपालिका मॅरेथॉन ही देशातील काही मॅरेथॉन स्पर्धांपैकी एक आहे, जी भारतीय खेळाडूंसाठी सर्वाधिक बक्षीस रक्कम देऊ करते. एकूण बक्षिसांची रक्कम अंदाजित ५० लाख पेक्षा अधिक असल्याने भारतातील नामांकीत लांब पल्ल्याच्या धावपट्टूंना ही मॅरेथॉन स्पर्धा नेहमीच आकर्षित करते. ॲथलेटीक फेडरेशन ऑफ इंडिया (AFI) द्वारे या स्पर्धेला राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा म्हणून मान्यता देण्यात आली आहे. धावण्याच्या स्पर्धामार्गाचे मोजमापास असोसिएशन ऑफ इंटरनॅशनल मॅरेथॉन्स ॲण्ड डिस्टन्स रन या संघटनेने मान्यता दिली आहे.

पूर्ण मॅरेथॉन, अर्ध मॅरेथॉन आणि ११ किमी रनसाठी नोंदणी शुल्क रु.७५० अधिक जीएसटी तर ५ किमी रनसाठी नोंदणी शुल्क रु.७०० अधिक जीएसटी असे आहे. www.vvmm.in या इव्हेंटच्या वेबसाईटवरून धावपट्टूंना नोंदणी करता येईल.

इव्हेंटची अधिक माहिती इव्हेंट हेल्पलाईन क्रमांक :८८७९५५९०४९/ ८२९१२६२८९२ वर उपलब्ध आहे.

**क्रीडा विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**